ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 2 | OCTOBER - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# मध्ययुगीन कर्यात सासवडची निर्मिती व वतनी व्यवस्था



प्रा. सुरेंद्र अर्जुन शिरसट
सहयोगी प्राध्यापक,
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे.

सासवड हे गाव पुण्याच्या आग्नेय दिशेला आहे. सध्या ते पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्याचे मुख्यलय आहे. हे सासवड शहर म्हणजे मध्ययुगीन कसबे सासवड होय. हे कसबे सासवड मध्ययुगीन कर्यात सासवडचे मुख्यलय होते. तत्कालिन कर्यात सासवड मध्ये एकुण १० गावे होती. पण अनोखी बाब म्हणजे ही सर्व गावे एकसलग अशा भुप्रदेशात नव्हती. यासाठी सोबतचा नकाशा पहा. यातील काही गावे परगणे सुपेच्या प्रदेशात मध्ये, काही परगणे कऱ्हेपठार तसेच परगणे निरथडीच्या प्रदेशात येतात.

## कर्यात तसेच कसबे सासवडच्या वतनांची हकिकत –

मध्ययुगीन सासवडची पाटीलकी कुंटे यांची होती. तर कुलकर्णी वतन गिधवे यांचे होते. कुंटे यांचे मावसभाऊ जगथाप (जगताप) होते. कुंटे यांची पाटीलकी जगथाप यांच्याकडे आली. आता जगथाप हे कर्यात सासवडचे देशमुख व कसबे सासवडचे पाटील बनले. कुलकर्णी असलेले गिधवे निपुत्रिक होते. त्यांनी त्यांच्या मुलीच्या कुटुंबास म्हणजे पानसे यांना कुलकर्ण वतन दिले. पुढे पानसे यांनी काशीला जायचे करणास्तव कुलकर्णी वतन विठ्ठलपंत अत्रे यांना विकले. अत्रे हे कर्यात सासवडचे देशकुलकर्णी व कसबे सासवडचे कुलकर्णी बनले. येथील ज्योतिष्य वतन राखियांचे होते. जगथाप व अत्रे यांच्या वतनप्राप्ती नंतरही ते वतन अनुभत होते. पुढे अत्रेंच्या वंशातील सातत्याने एकच वारसपूत्र राहिलेल्या पुढील पिढीतील वारस दुष्काळात गाव सोडून गेला. यामुळे देशमुख व देशकुलकर्णी यांनी सदर वतन पुरंदरे यांना दिले.[i]


बेदरच्या पातशाहाच्या दाईला पुणे परिसरातील बारा गाव मुकासा होते. मलिक दादर हा किल्ले पुरंदरचा हवालदार होता. सदर दाईने मलिक दादर बरोबर विठ्ठलपंत अत्रे व ज्यामत बिन हाऱ्या (हरजी) पाटील यांना बारा गावचा पोटमुकासा दिला होता. त्यांना बारा पैकी फक्त दहा गावेच ताब्यात घेता आली. ज्यामत पाटील व विठ्ठलपंत यांनी सदर दाईला नजर देऊन अनुक्रमे देशमुखी व देशकुलकर्णीपणाच्या वतनाचे फर्मान करून घेतले. मौजे खळद, मौजे कोडीत, मौजे दिवे, मौजे सासवड ही चार गावे प्रांत पुणे मधील, मौजे बेलसर, मौजे बाबुर्डी, मौजे कारखेल, मौजे मोढवे ही परगणे सुपे मधील आणि मौजे कोळोली, मौजे रांक ही परगणे शिरवळ मधील अशी दहा गावे त्यांनी जिंकली. मौजे मोरवें व मौजे पिंबुर्टी दोन्ही परगणे शिरवळ मधील गावे हरजी जगताप यांना ताब्यात घेता आली नाहीत. त्यांनी सासवड कसबा वसविण्याचा निर्णय घेतला. मौजे संवत्सर, सरंडी, तरंडी, पिंपळगाव,

हिंगणे व सासवड ही गावे एकत्र करून शके १४४१ मध्ये सासवड कसबा केला आणि त्याला जोडूनच पेठ सोमवार वसविण्यात आली.

पुणे पुरालेखागारातील प्रांत अजमास दप्तरातील इ.स. १७२०-२१ सालाच्या देहझाड्यानुसार पुणे प्रांतात एकूण २९० गावे व त्यात अंतर्भुत कर्यात सासवडची १० गावे होती. पुणे प्रांतांतर्गत उपविभाग स्वरुपात सहा तरफा आणि एक कर्यात होते. तरफांमध्ये तरफ हवेली, सांडस, पाटस, निरथडी, कऱ्हेपठार, कर्यात मावळ या सहा तरफा आणि कर्यात सासवड हे एक कर्यात होते. अठराव्या शतकापूर्वी कर्यात सासवड हे मुळात प्रादेशिकदृष्ट्या प्रांत पुणेचा भाग नव्हते. पण भौगोलिक सलगता, आर्थिक आणि राजकीय कारणांनी कर्यात सासवडचा हिशोब तत्कालीन ताळेबंद आणि हिशोब पत्रकांत प्रांत पुणे अंतर्गत दर्शविलेला आहे.

## कर्यात सासवड –

कसबे सासवड, मौजे कारखेल, कोळोली, कोडीत-बुद्रुक, खळद, दिवे, बेलसर, बाबुर्डी, मोढवे व राख ही १० गावे कर्यात सासवड मध्ये होती. बाळाजी विश्वनाथ यांनी पेशवेपदाचा कारभार पाहण्याची सुरुवात सासवड येथून केली. सासवड आणि किल्ले पुरंदर यांना पुणे प्रांताच्या मुख्यालयाचे स्थान होते.





**तक्ता १ कर्यात सासवड गावे व इनामाची व्यवस्था**

| साल | एकूण | इनाम | मोकासा | किल्ले सरंजाम | जिल्ह्याकडे |
|---|---|---|---|---|---|
| इ.स. १७१६-१७ | १० | ०४ | ०५ | -- | ०१ |
| इ.स. १७२०-२१[ii] | १० | ०४ | ०६ | -- | ०० |

उपरोक्त तक्त्यानुसार कर्यात सासवड मध्ये १० गावे होती. त्यापैकी ४ गावे इनाम दिलेली होती. पंतसचिव यांना सासवड, सोन ठाकुर यांना खळद व कोडीत बु॥, पिलाजी जाधव यांना दिवे ही चार गावे संबंधित व्यक्तींना इनाम दिलेली होती.

**तक्ता २ कर्यात सासवडचे कर उत्पन्न –**

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७१६-१७ | १७१८-१९[iii] | १७२३-२४ | १७२४-२५[iv] | १७२८-२९ | १७३२-३३[v] | १७३८-३९[vi] | १७४२-४३[vii] | १७५२-५३[viii] | १७६४-६५[ix] | १७७२-७३[x] | १७८२-८३[xi] | १७८६-८७[xii] | १७९२-९३[xiii] | १८०४-०५[xiv] |
| ८३१।= | १४३०। | २८३५ | ३३७३।= | २७१९ | २२१९ | १६९३ | १६३५॥ | ४७१९ | १३८३॥ | १५०३॥ | ३७१९। | ३२७७6= | ३४२१॥।= | २०० |




**तक्ता ३ कसबे सासवड : जमाखर्चाचे स्वरुप**

| **कसबा व साल** | **सासवड इ.स. १८१३-१४**[xv] |
|---|---|
| **एकूण जमा** | ९५४६6=॥ |
| **१. ऐन जमा** | ४१०१॥=॥। |
| १.१ जमिनीचा आकार | ३३७५6=॥। |
| १.२ मोहतरफा | ७२६॥ |
| **२. सिवाये जमा** | १४४८ |
| २.१ गावनिसबत / बलुते | ७४१6= |
| २.२ कमावीस | ३०० |
| २.३ जकात | ४०७ |
| **३. वाढीव कर / चढ** | ३५८५।–॥। |
| **एकूण खर्च** | ९७१४6=॥ |

| | |
|---|---|
| **१. गावखर्च** | **८८१॥** |
| १.१ हक्कदार | --- |
| १.२ देवस्थाने व प्रशासकीय | ८१॥ |
| १.३ स्वारी खर्च | --- |
| १.४ दरबार खर्च | --- |
| १.५ बद्दल मुशाहिरा | ८०० |
| **२. जिल्ह्याकडे** | **८८३२॥=॥** |
| २.१ पोता जमा | ५५०८ |
| २.२ वर्षासने | --- |
| २.४ इनाम जमिनी | २२६४॥=॥ |
| २.५ अंतस्त | १०६० |
| **बाकी / फाजिल** | **–१६८** |

**कर्यात सासवड-** कसबे सासवड, नाके बाबुर्डी, नाके कोळोली

**तक्ता ४ किल्ले पुरंदर-वज्रगड इतर तरफा व परगणे यांचे उत्पन्न-**

| साल | एकूण / गावे | सुपे | सासवड | खेडेबारे | वाठार (शिरवळ) |
|---|---|---|---|---|---|
| १७६५-६६[xvi] | ३७९३।= | १०६१॥।= | २७३१॥ | --- | --- |
| १८११-१२[xvii] | ६३४७ | १६१० | ४००७ | ५५५ | १७५ |
| गावे | १० | ४ | ३ | २ | १ |

कसबे सासवडला सुद्धा तीन पेठा होत्या. सासवड कसब्यामध्ये १८ व्या शतकात पेठ अंबर, पेठ भैरव व पेठ सोमवार अशा तीन पेठा होत्या.[xviii] सुगंधी द्रव्य, अत्तर बनविण्याचा कुटिरोद्योग कसबे सासवड येथे चालत असल्याची माहिती मिळते.[xix] बाळाजी विश्वनाथ इ.स. १६९९ पासून पुण्याचा सुभेदार होता. त्यास पेशवाईची वस्त्रे प्राप्त झाल्यानंतर त्याने पेशवाईचा कारभार सासवड किंवा किल्ले पुरंदर ऐवजी पुण्यातून बघण्याचे ठरवले.

1. व्यापारी मार्ग - पुणे ते सातारा :- पुणे, बोपदेव घाट, सासवड, जेजुरी, दहिगाव, माहूली, सातारा.
2. पुणे ते पुरंदर :- पुणे, बोपदेव घाट,सासवड, पुरंदर.

तरफेच्या हवालदाराचे वेतन इ.स. १७३२-३३[xx] मध्ये ६१ रुपये तर इ.स. १७४२-४३[xxi] मध्ये ६० रुपये असल्याची नोंद मिळते. मुजुमदाराचे वेतन पाहता इ.स. १७३२-३३[xxii] मध्ये ५० रुपये तर इ.स. १७४२-४३[xxiii] मध्ये ५० रुपये होते.

अशा प्रकारे पुणे प्रांतातील कर्यात सासवडची निर्मिती कशी झाली याची माहिती मिळते. बेदरच्या पातशाहाच्या दाईला पुणे परिसरातील बारा गाव मुकासा होते. मलिक दादर हा किल्ले पुरंदरचा हवालदार होता. सदर दाईने मलिक दादर बरोबर विठ्ठलपंत अत्रे व ज्यामत बिन हाऱ्या (हरजी) पाटील यांना बारा गावचा पोटमुकासा दिला होता. त्यांना बारा पैकी फक्त दहा गावेच ताब्यात घेता आली. ज्यामत पाटील व विठ्ठलपंत यांनी सदर दाईला नजर देऊन अनुक्रमे देशमुखी व देशकुलकर्णीपणाच्या वतनाचे फर्मान करून घेतले. अशा प्रकारे कर्यात सासवड आणि त्या अंतर्गत कसबे सासवड तयार झाले. या सासवड कर्यातची महसुली अर्थव्यवस्था समजावून घेण्याचा प्रयत्न आपण केला.

[i] विश्वनाथ काशिनाथ राजवाडे (संपा.), **मराठ्यांच्या इतिहासाची साधने**, खंड- १८, मुंबई, १९०९, पृ. ८५-८७.

[ii] पुणे पुरालेखागार, प्रांत अजमास दप्तर ४२७ देहझाडा- इहिदे अशरीन मया अलफ.

[iii] कित्ता २६ हिशोब इजमाईली

[iv] कित्ता ४२७ तर्जुमा जिल्हे.

[v] कित्ता ४२७ तर्जुमा जिल्हे सलास सलासीन मया अलफ.

[vi] कित्ता २७ हिशोब समन समानीन मया अलफ.

[vii] कित्ता २६ हिशोब सलास अर्बेन मया अलफ.

[viii] कित्ता २६ ताळेबंद झडती- ऐन जिन्नस सलास खमसैन मया अलफ.

[ix] कित्ता २६

[x] कित्ता २७ झडती सलास समानीन मया अलफ.

[xi] कित्ता ३३ झडती सलास समानिन मया अलफ.

[xii] कित्ता ३४ तेरीज जमाबंदी.

[xiii] कित्ता ३८ झडती अर्बा तिसैन मया अलफ.

[xiv] कित्ता ३९ झडती खमस मयातैन अलफ.

[xv] कित्ता, पुणे जमाव दप्तर, रुमाल ६९६.

[xvi] कित्ता, रूमाल क्र.- १०१, झडती, किल्ले पुरंदर व वज्रगड, सित सितैन मया अलफ.

[xvii] कित्ता, रूमाल क्र.- ११३, झडती, किल्ले पुरंदर व वज्रगड, इसन्ने अशर मयातैन व अलफ.

[xviii] सुमित्रा कुलकर्णी, पुर्वोक्त, पृ. १०५.

[xix] कित्ता.

[xx] कित्ता, पुणे, रुमाल क्रमांक- ४२७, तर्जुमा जिल्हे, सलास सलासीन.

[xxi] कित्ता, रूमाल क्र. २६, हिसेब, सुहुर सन सलास अर्बेन मया व अलफे.

[xxii] कित्ता, पुणे, रुमाल क्रमांक- ४२७, तर्जुमा जिल्हे, सलास सलासीन.

[xxiii] कित्ता, रूमाल क्र. २६, हिसेब, सुहुर सन सलास अर्बेन मया व अलफे.